# अतिमानवतेकडे

...अथवा

बाकी सर्व जेव्हा असफल होते तेव्हा आपल्यालाच मिळू शकते
आपल्या आंत लपलेली पूर्ण रूपांतरासाठी एक किल्ली-

-श्रीअरविंद
सावित्री पान-२५६.

*गूढ रहस्ये साधीशीच असतात.*
*कारण सत्य साधे असते. ती जगांतील सर्वात*
*साधी गोष्ट आहे-*
*म्हणून बघतहि नाही आपण त्याच्याकडे.*
*जगांत एकच वस्तू आहे,*
*दोन नाहीत.*

*आता हे आधुनिक भौतिकशास्त्रज्ञांच्या आणि गणितज्ञांच्या लक्ष्यांत येऊ लागलं आहे. आणि लहान बालक, जेव्हा ते सूर्यप्रकाशाने धवळलेल्या किनाऱ्यावर पसरणाऱ्या लाटांकडे बघून हंसत असतं तेव्हा त्यालाही हे माहीत असतं.*

काळप्रवाहाच्या सुरवातीपासून त्याच लाटांवरचा फेस पसरत आलेला आहे, त्यांच्यातून उसळणाऱ्या त्या महान् लयीची स्मृति वर येते आहे आणि त्याच लाटा दिवसांचे आणि व्यथांचे एकसंध गोष्टीत विणकाम करीत आहेत, इतकं प्राचीन की असं वाटतंय की जणुकांही ती एक कधीच न बदलणारी अशी उपस्थिति आहे, अपरिवर्तनीय असे अस्तित्व आहे, सर्व सामावून घेणारी अशी ती त्याची अथांगता की समुद्रपक्ष्यांचे पाण्यावर झेपावून तरंगणे सुध्दा त्यात आले. आणि सर्वकांही त्या एका क्षणांत सामावले आहे- सर्व युगा-युगांची आणि सर्वच्या सर्व जीवांची गोळाबेरीज आहे ती, सर्वकांही भरले आहे त्या एका चिमुकल्या बिंदूत जो त्या फेसाळणाऱ्या वादळी लाटेवर क्षणार्धच चमकून उठतो. पण आपण तो बिंदु, ते स्मित, तो गाणारा रुणझुणता क्षण गमावून बसलो आहोत. म्हणून मग, ती एकता परत मिळविण्यासाठी आपण आपल्या संगणकांप्रमाणे बेरजा करू लागलो: १+१+१+....

जणु कांही, शक्य त्या सर्व बाजूंनी जमवून ज्ञानाची माहितीची गोळाबेरीज करून त्यांतून योग्य तो स्वर मिळेल, तो स्वर की जो एका विस्मृतीत गेलेल्या बालकाच्या हृदयाला स्पर्श करतो आणि जग हेलावून सोडणारे असे ते गाणे परत पुढे आणतो- तोच तो स्वर. आपण तो, 'साधेपणा' सर्वसामान्यांना सुध्दा कळावा म्हणून त्याचे 'उत्पादन' करण्याचा प्रयत्न केला, पण आपण जितक्या हुशारीने म्हणून जीवन साधे-सरळ करण्याकरिता आपली समीकरणे राबविली तितकाच तो साधेपणाचा पक्षी आपला निसटून पुढे पुढेच चालला!

अगदी तो सुंदर चमकदार फेस सुध्दा आपल्या त्या गणिती समीकरणांनी गढूळ झाला. आपल्याला याचीसुध्दा खात्री उरली नाही की आपलं शरीर तरी आपलंच आहे की नाही. त्या सुंदर यंत्राने सर्वच गोष्टींचं भक्षण केलं. तरीपण 'ती एक गोष्ट - तत्' मात्र तशीच आहे आणि ती एकमेव.

*सर्व शक्तिमानता तिच्यांत भरलेली अशी ती एक गोष्ट मात्र तशीच आहे.*
*कारण जे एका बिंदूवर विलसत असतं तेच इतर सर्व बिंदूंवरहि चमकत असतं.*
*एकदा हे समजलं की मग बाकीचं सारं समजतं;*
*या जगांत केवळ तीच 'एकमेव शक्ति' आहे-*
*दोन नाहीत-*
*एकमेवाद्वितीय.*
*हे तर अगदी लहान बालकालाही माहीत असतं- ते राजा असतं अजेय असतं.*
*पण बालक मोठं होतं आणि सर्व विसरून जातं.*

*आणि माणसेही मोठी झाली. आणि*
*राष्ट्रे व संस्कृती, प्रत्येकजण ते महान् रहस्य स्वत:च्या पध्दतीने शोधीत आहेत-*
*अगदी साधं गुपित-*
*युध्द आणि विजयांतून, ध्यानांतून किंवा जादूतून, सुंदरतेतून,*
*धर्मातून किंवा विज्ञानांतून, जरी खरं तर आपल्याला माहीत*
*नाही की कोण प्रगत आहे:*
*अ‍ॅक्रोपोलिस बांधून काढणारा की थीबन जादुगार की*
*केप केनेडीवरून अवकाशयाने उडविणारे खगोलशास्त्रज्ञ किंवा सिस्टरशियन यती*
*कारण, एकाने जीवन समजून घेण्यासाठी त्याचा त्याग केला आहे,*
*दुसऱ्याने जीवन समजून घेतल्याशिवायच त्याला कवळून घेतले आहे,*
*आणखी एकाने सौंदर्याच्या खुणा मागे ठेवल्या आहेत,*
*आणखी दुसऱ्या एकाने तर न बदलणाऱ्या नित्य असलेल्या आकाशांत एक शुभ्र रेषा ओढली आहे-*
*आपण तर या यादीत अगदीच शेवटी मागच्या टोंकावर आहोत- एवढेच. आणि अजूनहि आपल्याला*
*आपली जादू मिळालेलीच नाही.*
*तो बिंदु, तो सामर्थ्यवान् छोटासा बिंदु,*
*अजूनहि जगाच्या उघड्या किनाऱ्यावर तसाच आहे;*
*जो कोणी त्याला पकडील त्याच्यासाठी तो चमचमतो आहे,*
*जसा तो आपण आकाशांतील तारामंडळाखाली केवळ माणसेच होतो तेव्हा चमचमला होता.*
*इतर अनेकांनी बहुतेक त्या रहस्याला स्पर्श कलेला आहे.*
*कदाचित् ग्रीक लोकांना ते माहीत होते, आणि इजिप्शियन लोकांना सुध्दा. आणि वेदकालीन भारतीय ऋषींना तर नक्कीच.*

पण रहस्ये ही सुंदरशा झाडावरील फुलासारखी असतात. त्यांचे त्यांचे म्हणून ऋतू असतात, कोणाच्याही नजरेआड त्यांचा विकास होतो आणि ती अचानकच उमलतात-फुलतात-बहरतात. प्रत्येक गोष्टीची म्हणून 'एक वेळ' असते, वर आपल्या आकाशांत तयार झालेले तारकापुंज आणि भरतीच्या लाटेतून उसळलेल्या फेसाच्या चमकदार कणिकांनी मढलेल्या खडकांपर्यंतचा करढोक पक्ष्यांच्या प्रवासाचा मार्ग-

*सर्वकांही एकाच एका संकेतानुसार गति घेत असते.*
*आणि त्याचप्रमाणे माणसे देखील.*
*एक रहस्य म्हणजे एक ज्ञान आणि शक्ति, याला देखील त्याचा स्वत:चा म्हणून अंगभूत असा काळ, त्याची स्वत:चीच अशी वेळ असते; एक छोटीशी पेशी की जी इतरांपेक्षा अधिक विकसित आहे,*

ती सुध्दा आपल्या स्वत:त तिच्या स्वत:च्या ज्ञानाची शक्ति धारण करू शकत नाही, म्हणजे उत्क्रांतीसाठी भूमिका पुरेशी तयार नसेल तर, जगामध्ये बदल घडविणे, महावृक्षांना लवकर, वेळेआधीच बहर आणणे असे ती घडवू शकत नाही. पण वेळ आलेली आहे.

*वेळ आलेली आहे आणि ती साऱ्या पृथ्वीवर बरसते कोसळते आहे, ते नजरे आडचं फूल बाह्यत: जरी एखाद्या चिघळलेल्या पुळीसारखे विद्रुप आणि घाण दिसत आहे तरी-*
*परिवर्तनाची रूपांतराची वेळ आलेली आहे.*
*विद्यार्थ्यांनी कलकत्त्यामध्ये गांधींच्या पुतळ्याचं डोकं उडविलं,*
*जुन्या देवता भुईसपाट झाल्या,*
*तर्कबुध्दीवर आणि तत्त्वज्ञानावर पोसलेली मने विध्वंसाच्याच आरोळ्या ठोकीत आहेत आणि परकीय रानटी लोकांना आपल्या स्वत:चा तुरुंग तोडायला बोलावून आणीत आहेत-*
*जसं त्या प्राचीन रोमन लोकांनी केलं!*
*दुसरे कांहीजण नशेत झिंगून राहण्याचे पसंत करतात. त्यांना तोच स्वर्ग वाटतो.*
*दुसरं कांहीहि यापेक्षा बरं!*

आणि पृथ्वी मात्र तिच्यावर पडलेल्या भेगा-भेगांमधून, तिच्या असंख्य चिरांमधून धापा टाकीत आहे कण्हत आहे, तिच्या विशाल शरीरांतील पेशी-पेशींमधून परिवर्तन घडत आहे रूपांतर होत आहे. आपल्या काळांतील ही विघ्ने म्हणजे पडद्याआडचा नवा जन्मच आहे, आणि हा प्रसंग कसा हाताळावा हे आपल्याला माहीत नाही. ज्याप्रमाणे त्या भल्या मोठ्या वानरांमधून पहिला मानव हालचाल करूं लागला त्यावेळी त्या वानरांची जी स्थिति झाली असेल त्यांच्यासारखीच स्थिति आपलीही झालेली आहे- या उत्क्रांत होत जाणाऱ्या पुढे येऊ घातलेल्या पुरोगामी मानवजातीच्या आगमनामुळे! पण हे पार्थिव ऐहिक शरीर एकसंध एकच असल्यामुळे उपायही एकच आहे, तो म्हणजे **सत्य** आणि एक बिंदु जरी बदलला तरी तो इतरांनाही बदलेल. पण कांही असो, हा बिंदु आपले कायदे सुधारण्यात गवसणार नाही, आपल्या व्यवस्था आणि चालीरिती, विज्ञान-शास्त्रे, आपले संप्रदाय, वैचारिक पंथ किंवा रंगीबेरंगी आकर्षक रोचक वादविवाद हे सर्व त्या जुन्या यंत्राचेच भाग आहेत; (त्याचा) एकही खिळा घट्ट करण्याची काही जरूरी नाही; आपण त्याच्या अतिरेकाने घुसमटून चाललेलो आहोत. आणिक परंतु त्या बिंदूलाही आपल्या तर्कबुध्दीशी कांहीहि देणं-घेणं नाही; खरं तर या तर्कबुध्दीनेच 'मशीनची' शक्कल काढली, किंवा, सुधारणाऱ्या माणसाबरोबरच त्याच्या दौर्बल्याचा आणि भूतकाळांत जमा झालेल्या त्याच्या थोरवीचा हे यंत्र उदोउदो करीत आहे. 'अपूर्ण असा मनुष्यप्राणी हा या प्रकृतीचा शेवटचा शब्द नाही', असं श्रीअरविंद म्हणतात. पण त्याचे पूर्णत्व हे सुध्दा आत्म्याचे शेवटचे शिखर नाही. खचितच, आपल्या बुध्दीच्या आवांक्यापलीकडे असलेल्या भविष्यांत हा बिंदु कुठेतरी आहे, पण तो अस्तित्वाच्या खोल अंतर्भागांत पालवी गळून गेल्याने निष्पर्ण झाले तरी 'फ्लेम' झाडाची[१] फुले जशी वाढत असतात तसा वाढतो आहे- पण आपण जर कोणत्याही गोष्टीच्या गाभ्यापर्यंत हृदयापर्यंत गेलो तर आपल्याला भविष्याकडे नेणारी गुरुकिल्ली मिळते, एक कळ सांपडते. पण, जर आपल्या मोजमापांमध्ये नाही तर मग तो गाभा ते हृदय आहे तरी कुठे? कोण्या एका दिवशी एक जलचर पाण्याबाहेर आलं आणि उडण्याचा प्रयत्न करूं लागलं, जंगलांतून बाहेर आलेल्या पहिल्या वहिल्या श्रेष्ठ, उच्च प्रकारच्या प्राण्यांनी एक वेगळीच नजर आजूबाजूच्या जगावरून फिरवली. तेव्हा तीच ती एकच अनिवार्य इच्छा त्यांना दुसऱ्या अवस्थेचे चिंतन करायला लावीत होती. आणि कदाचित् ती रूपांतर करण्यास समर्थ असलेली सारी शक्ति त्या एका कटाक्षांत सामावलेली होती. तो कटाक्ष 'त्याकडे'- त्या कांहीतरी दुसऱ्या गोष्टीकडे फेंकलेला होता; ती इच्छा, अज्ञात आर्त हांक घालणारा तो बिंदु, त्याच्यामध्ये भविष्याकडे नेणाऱ्या धरणाच्या बंद झडपा सताड उघडण्याची शक्ति आहे. खचितच, त्या बिंदुमध्ये सर्व समावलेलं आहे, तो सर्वशक्तिमान् आहे. कारण, तो बिंदु म्हणजे आहे एक ठिणगी- अमित अद्वितीय अशा सूर्यतेजाची,

*जी प्रत्येक मनुष्याच्या आणि वस्तुमात्राच्या हृदयांत चमकत असते,*

स्थळकाळाच्या प्रत्येक कणांत आणि क्षणांत, फेसावरच्या प्रत्येक कणिकेत चमकत असते ती, अखंड वर्धमान् असते अन् ज्याची झलक त्याने-त्या श्रेष्ठ प्राण्याने निमिषार्धात पाहिलेली असते-

आणि आम्ही ठामपणे म्हणतो की असा एक भविष्यकाळ आहे की जो मनाच्या सर्व इलेक्ट्रॉनिक स्वर्गां पेक्षाही खूपच अद्भुत-सुंदर असा आहे. माणूस हा शेवट नाही. जसा, सरपटणाऱ्या प्राण्यांमध्ये सर्वात उच्च स्तरावरचा पुरातन प्राणी देखील नव्हता-

*उत्क्रांतीच्या त्या महाविशाल लाटेचे कोणतेही उंच शिखर शेवटचे कसे असूं शकेल?*

आपण स्वत:च ते स्वत:मध्ये स्वच्छपणे बघू शकतो: असं दिसतं की आपण सारखे सारखे विलक्षण, अद्भुत अशा यंत्रांचा शोध लावत गेलो. मनुष्याच्या मर्यादा न थांबता सारख्या खेचत गेलो- ताणत ताणत वाढवीत गेलो - अगदी गुरु आणि शुक्रापर्यंत. पण हा सर्व देखावा मात्र आहे- वाढत्या मापाने अधिकाधिक खोटारडे आणि जुलमी मात्र बनत गेलो- आणि आपण कांहीच विशाल महान् असे केले नाही. आपण फक्त विश्वाच्या दुसऱ्या टोंकाला मनुष्य नांवाचा एक असा दयनीय केविलवाणा प्राणी मात्र पाठविला की ज्याला स्वत:च्या जातीची काळजी कशी घ्यावी, माणसांनी माणसांनाच कसं सांभाळावं एवढंसुध्दा माहीत नाही, इतकंच नव्हे तर आपल्या स्वत:च्याच गुहांतून-घरांमधून काय दडलं आहे- ड्रॅगन की एखादं चिमुकलं, ऊं ऊं करणारं बालक हे सुध्दा त्याला ठाऊक नाही. आपण प्रगति करीत नाही तर एक अवाढव्य मानसिक फुगा बेसुमार फुगवितो आहोत- की जो आपल्याच तोंडासमोर फुटूं शकेल. आपण मनुष्याला सुधारलं नाही; आपण

त्याला फक्त अजस्त्र बनविलं. आणि याखेरीज दुसरं कांही होऊही शकलं नसतं. दोष कांही कोणत्या अपूर्णतेत कमतरतेत किंवा आपल्या गुणांत किंवा बौध्दिक क्षमतांमध्ये नाही, कारण ते कितीही टोंकापर्यंत ताणले तरी ते बनवू शकतात फक्त अतिसज्जन किंवा अधिकमोठी यंत्रे- अक्राळविक्राळ राक्षस. जसा एखादा बिळांतला सरपटणारा प्राणी उत्क्रांति घडवून आणू शकत नाही तसेच एखादा सज्जन संन्यासीही उत्क्रांति किंवा विकास घडवून आणूं शकत नाही. किंवा आपण हे सर्व विसरून जाऊ. सत्य हे आहे की मनुष्यत्वाचे किंवा कोणत्याही गोष्टीचे शिखर हे त्या त्या तऱ्हेचीच किंवा त्या त्या जातीचीच सर्वोच्च श्रेणीची परिसीमा गांठल्याने प्राप्त होत नाही. ते सर्वोच्च शिखर आणखी कशांत तरी निहित असते. ते त्याच्याच जातीमध्ये किंवा जे आपण बनावे अशी त्याची इच्छा असते त्यांत '**ते**' नसते. असा हा उत्क्रांतीचा नियम आहे.

मनुष्य हा शेवटचा शब्द, शेवटची निर्मिति, शेवट नाही; मनुष्य हा 'संक्रमणावस्थेतील प्राणी' आहे, असं श्रीअरविंदांनी बऱ्याच काळापूर्वी म्हणून ठेवलेलं आहे. ज्याप्रमाणे आम्रवृक्षाच्या सर्वांत उंच फांदीवरील अगदी टोकाची लहानशी टिक्षी सुध्दा त्याच्या बीजांतच दडलेलीच असते त्याप्रमाणे मनुष्यसुध्दा अपरिहार्यपणे मनुष्यत्वाच्या पलीकडे-अतिमनुष्यत्वाकडे चालला आहे. त्यामुळे, आपला पूर्ण वेळचा एकमेव उद्योग, आपली एकमेव समस्या, युगायुगांमधून आपण सोडविण्याचा प्रयत्न केलेला एकमेव प्रश्न आणि आत्ता हीच एकमेव गोष्ट की जी दुखऱ्या भागापासून तोडून काढावी त्याप्रमाणे आपल्या पृथ्वीरूपी विशाल जहाजाची एकन् एक फळी तोडून काढीत आहे- ती समस्या म्हणजे हे स्थित्यंतर घडवावे तरी कसे? निट्त्से सुध्दा हेच म्हणाला होता. पण त्याचा अतिमानव म्हणजे माणसाचेच भयंकर अजस्त्रीकरण- आहे तोच माणूस आहे तशाच स्थितीत अधिकाधिक अवाढव्य करणे. आणि त्याने युरोप पादाक्रांत करताना, काय केले ते आपण पाहिलेच! ती कांही उत्क्रांतीतून चाललेली प्रगति नव्हती, तर केवळ काळ्या-गोऱ्या कातडीच्या माणसांच्या जुन्याच अहंकारी रानटीपणाकडे परतणे होते. ह्या असल्या अतिमानवाची आपल्याला मुळीच गरज नाही, आपल्याला वेगळं कांही हवं आहे. ज्याप्रमाणे बाखच्या सुंदर स्वर- रचना (cantatas) ही सुरवातीच्या जंगली माणसाच्या डुरकण्या- रेकण्यापासून जशा सर्वस्वी वेगळ्या असतात तसंच आपल्याला हवं असणारं हे 'वेगळं कांही' अगोदरच माणसाच्या हृदयांत गुंजन करू लागले आहे. आणि खरंच, जेव्हा आपला आंतला कान भविष्यांतील सुरेल-सुसंवादी रचना ऐकायला लागतो तेव्हा बाखची सुंदर स्वरवाक्ये सुध्दा त्यापुढे फिकी वाटतात. तर हा तो उघडलेला मार्ग आहे. हा नवीन विकास आहे. श्रीअरविंद आणि त्यांचे कार्य पुढे नेणाऱ्या श्रीमाताजी यांच्याकडून आम्हीं जे कांही शिकलो त्याच्या प्रकाशांत हे सर्व आम्ही विवरून पारखून पाहू इच्छितो. श्रीमाताजींनी हे स्थित्यंतर प्रत्यक्ष कार्यवाहीत कसकसे आणले जाईल ते पाहिले त्यामुळे आपण तेच सूत्र घेऊन विशिष्ट पध्दतशीरपणानेच काम करू शकतो. हे परिश्रम आपण घेतलेच पाहिजेत. आपल्या स्वत:च्या उत्क्रांतीसाठी, विकासासाठी काम केले पाहिजे; अन्य लोक टेस्टट्यूब बेबीज बनविण्यांत गुंतलेत- ते त्यांच्या स्वत:च्याच राक्षसीपणाचे प्रतिध्वनी ऐकतील कदाचित्! पण आपण आपली स्वत:चीच प्रयोगशील उत्क्रांति, विकास साधला पाहिजे.

जीवनाचे रहस्य जीवनांत नाही. माणसाचे रहस्य माणसांत नाही. 'कमळाचे मर्म ते ज्यांतून उगवते त्या चिखलांत आहे.' असं श्रीअरविंदांनी म्हटलं आहे; आणि तरीपण चिखल आणि सूर्याचा एक किरण सुसंवादाची अधिक वरची मात्रा अधिक वरची श्रेणी निर्माण करण्यासाठी एकत्र मिसळले. हे ते 'बदलाचे' दृश्य आहे, हाच तो पूर्ण रूपांतराचा बिंदु आहे. जो आपण शोधला पाहिजे, प्राप्त केला पाहिजे. तर मग आपल्याला कदाचित् सांपडेल की ते समुद्रकिनाऱ्यावरचं शांत बालक त्या उसळणाऱ्या फेसाच्या कणिकांमध्ये काय चिंतन करीत होतं;

*आणि सांपडेल ते सर्वोच्च संगीत जे विश्वपट विणीत होतं आणि दिसेल एक '**अद्भुत**' जे आपली वेळ येण्यासाठी प्रतीक्षा करीत होतं.*

*अन् जे मानवाला अशक्य होतं ते बनून जाईल निव्वळ एक 'बालक्रीडा'.*

***

१. तळटीप : फ्लेम फूल= जपानी कंदील, एका प्रकारची जास्वंद.